# <u>वसई विरार शहर महानगरपालिका</u>

**मा. सर्वसाधारण सभा दिनांक २०/१०/२०१५**

**सायं ४.०० वा.**

<table>
<tr><th>अनु. क्र.</th><th>विषयाचे नाव</th><th>मा. सर्वसाधारण सभेचा निर्णय</th></tr>
<tr><td>१</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १४/०९/२०१५ रोजीचे इतिवृत्त कायम करणे.</td><td>मागील मा. सर्वसाधारण सभा दि. १४/०९/२०१५ रोजीचे इतिवृत्त दुरुस्तीसह कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक - अब्दुल हक पटेल सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रश्नोत्तरे</td><td>
<table>
<tr><td>१</td><td>२०/१०/२०१५</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>महानगरपालिकेच्या लेखा परिक्षणात आक्षेप आहे की, महानगरपालिकेने विविध अधिकारी/कर्मचारी यांना अग्रीम रकमा दिलेल्या आहेत. (सन २००५-०६ पासून) त्यांचे समायोजन झाले काय? अथवा त्या वसुल केल्या काय? याबाबत माहिती</td><td>मा. मुख्य लेखाधिकारी</td></tr>
<tr><td>२</td><td>२०/१०/२०१५</td><td>श्री. धनंजय विठ्ठल गावडे</td><td>प्रभाग समिती क नालासोपारा येथे सन २०११-१२ या वित्तीय वर्षात मालमत्ता कराची आकारणी करताना दोन ते तीन प्रकरणांत मा. आयुक्त यांची मंजुरी घेतलेली नाही. असा शंक लेखा परिक्षणात घेतलेला आहे.</td><td>मा. सहाय्यक आयुक्त, प्रभाग समिती ई नालासोपारा</td></tr>
<tr><td>३</td><td>२०/१०/२०१५</td><td>श्री. किरण पुरुषोत्तम भोईर</td><td>वसंत नगरी लिंक रोडमध्ये असलेल्या ZCC-P ४-Pocket प्रकरणी विकास कामे भोगवटा प्रमाणापत्राकामी महानगरपालिकेस किती रक्कम (इमारत निहाय) देय आहे, रश्मी विकासकास प्रती इमारतीमागे कसा व किती कर आकारलेला आहे याची माहिती</td><td>मा. उपसंचालक, नगररचना</td></tr>
</table>
अनुमोदक - संजय पिंगुळकर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर</td></tr>
<tr><td>३</td><td>शासकीय पत्रव्यवहार माहितीस्तव</td><td>१ महाराष्ट्र शासन, आदिवासी विकास विभाग, शासन निर्णय क्र. वहका/२०१५/प्र.क्र.६१/का-१४, मंत्रालय, मुंबई दि. ०८/०९/२०१५</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | | अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ४ | **विरार पूर्व भाटपाडा येथील तलाव/उद्यान सुशोभिकरण करणेत आलेला परिसर त्या विभागातील महिला बचत गटास देखभालीखाली देणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका हद्दितील विरार (पू.) भाटपाडा येथील तलाव/उद्यान सुशोभिकरण करणेत आलेला परिसर त्या विभागातील महिला बचत गटास उपलब्ध करुन देणेस हि सभा मान्यता देत आहे. असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - भारती देशमुख सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ५ | **मा. आयुक्त व अतिरिक्त आयुक्त, वसई-विरार शहर महानगरपालिका ह्यांचे निवासस्थानाकरीता सदनिका भाडे तत्वावर घेणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिका आयुक्तांकरिता कायमस्वरुपी आयुक्त निवास स्थान उपलब्ध नाही. मा.आयुक्त तसेच मा.अतिरिक्त आयुक्त यांचे निवासाकरिता वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीत सर्व सुविधांनी परिपूर्ण असे निवास स्थान भाडेतत्वावर घेणे आवश्यक आहे.<br>तरी मा.आयुक्त तसेच मा.अतिरिक्त आयुक्त यांचेसाठी योग्य असे निवास स्थान भाडेतत्वावर घेणेसाठी होणाऱ्या खर्चास हि सभा प्रशासकीय व वित्तीय मान्यता देत आहे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - पुष्पा जाधव सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ६ | **वसई रोड पश्चिम दिनदयाल नगर येथील मुख्याधिकारी निवास स्थानाचा वापर विश्रांतीगृहासाठी करणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात विविध प्रकल्पांसाठी, कामांसाठी शासकीय अधिकारी भेटी देत असतात. त्यांना विश्रांतीसाठी महापालिकेचे कोणतेही निवासस्थान नाही. त्याचप्रमाणे महानगरपालिकेच्या अधिकारी त्यांनाही बऱ्याचवेळा विविध विषयांवर विचार विनिमय करण्यासाठी थांबण्याची आवश्यकता असते. भुतपूर्व नवघर माणिकपूर नगरपरिषद कालावधीत दिनदयाल नगर येथे जोशी नर्सिंग होम समोरील निवासस्थान G+१ इमारतीचे बांधकाम करण्यात आलेले आहे. सदर इमारतीमध्ये मुख्याधिकारी निवास स्थान म्हणून वापरण्यात येत होते. महापालिकेची स्थापना झाल्यानंतर सदर निवास स्थानाचा वापर मुख्याधिकारी निवास म्हणून वापर होत नाही. सदर मुख्याधिकारी निवासस्थान वापर रेस्ट हाऊस (विश्रांतीगृह) करिता वापर करणेसाठी मा. आयुक्त ह्यांनी शिफारस केलेली आहे.<br>तरी सदर मुख्याधिकारी निवासस्थानांचा रेस्ट हाऊस (विश्रांतीगृह) म्हणून वापर करण्यास ही सभा मान्यता देत आहे असे ही सभा ठरविते आहे.<br>अनुमोदक - अब्दुल हक पटेल सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वांनुमते मंजुर |
| ७ | **वसई-विरार शहर महानगरपालिका नालासोपारा पुर्व येथील विजयनगर तुळींज रुग्णालयातील डायलेसिस सेंटर कार्यान्वित करणेसाठी दर निश्चिती करणे** | **ठरावाचा निर्णय :-** वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नालासोपारा पूर्व येथील विजयनगर तुळींज रुग्णालयातील डायलेसिस सेंटर कार्यान्वीत करणेसाठी दरनिश्चिती करणे व आवश्यक कर्मचारी वर्ग नेमणेस मान्यता मिळणेबाबतच्या विषयावर सभागृहात सविस्तर चर्चा होऊन असा निर्णय घेण्यात आला की, महानगरपालिकेच्या नालासोपारा पूर्व येथील विजयनगर तुळींज रुग्णालयातील डायलेसिस सेंटर कार्यान्वीत करणेसाठी दोन शिफ्ट मध्ये आवश्यक अधिकारी व कर्मचारी वर्ग |

| | | |
|---|---|---|
| | **व आवश्यक कर्मचारी नेमणेस मान्यता मिळणेबाबत.** | नियुक्त करण्याची आवश्यकता असल्याने नेफ्रोलॉजीस्ट डॉक्टर- १ या डॉक्टरांना डिप्लोमा धारकास दरमहा रु.५०,०००/- व डिग्री धारकास दरमहा रु.५५,०००/- तसेच पर्यवेक्षक डायलेसिस तंत्रज्ञ -१ या तंत्रज्ञास दरमहा रु.२५,०००/- व डासलेसिस तंत्रज्ञ-४ या प्रत्येकी तंत्रज्ञास रु.२०,०००/- इतके दरमहा मानधन देऊन महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ५३(३) नुसार मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकारा नुसार तात्पुरत्या स्वरुपात ६ महिन्यासाठी अस्थायी स्वरुपात कंत्राटी पध्दतीने वरील नमुद आवश्यक डॉक्टर व तंत्रज्ञ नियुक्त करण्यास ही सभा मंजुरी देत आहे. तसेच रुग्णालयात सदरची सेवा उपलब्ध करुन देताना प्रत्येक रुग्णांकडून रु.३५०/- इतकी रक्कम घेण्यास ही सभा मंजुरी देत असून या कामी येणाऱ्या संपूर्ण खर्चास प्रशासकीय वित्तीय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - पंकज ठाकूर सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ८ | **वसई-विरार शहर महानगरपालिका व साहित्य जल्लोष प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने संपादक संमेल्लन व साहित्य जल्लोष हे कार्यक्रम आयोजित करणेस व त्याकामी येणाऱ्या खर्चास आर्थिक व प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.** | **प्रस्तावाचा निर्णय :-** वसई-विरार शहर महानगरपालिका व साहित्य जल्लोष प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमानाने संपादक संमेलन व साहित्य जल्लोष हे कार्यक्रम आयोजित करणेस व सदर कार्यक्रमासाठी लागणारे साहित्य १) निमंत्रण पत्रिका २) वर्तमानपत्र व केबल जाहिरात ३) फ्लेक्स ४) बॅनर छपाई ५) हार ६) पुष्पगुच्छ ७) आरतीचे सामान ८) मंडप व स्टेज सजावट ९) सिलबंद पाणी १०) प्रमुख पाहुण्यांचे मानधन ११) फाईल व फोल्डर १२) टपाल खर्च १३) चहा व नास्ता १४) जेवण १५) प्रमुख पाहुण्याचे VIP बॅच १६) श्रीफळ १७) शाल १८) फोटोग्राफी व व्हिडीओ शुटींग १९) सन्मान चिन्ह २०) साऊंड सिस्टम २१) वाय.एम.सी.ए. सभागृह भाडे २२) प्रमुख पाहुण्यांचे वाहन व्यवस्था तसेच या कार्यक्रमासाठी लागणाऱ्या इतर अनुषंगिक कामांसाठी मंजुर निविदा धारकांकडून आवश्यक साहित्य पुरवठा तथा इतर अनुषंगिक बाबी उपलब्ध करुन घेणेकामी तसेच प्रमुख पाहुण्यांचे मानधन व सभागृहाचे भाडे रोखीने देणेसाठी रक्कम रुपये २,५०,०००/- लक्ष इतकी रक्कम अग्रीम स्वरुपात संबंधितास उपलब्ध करुन देण्यास ही सभा मंजुरी देत असून सदर कार्यक्रमांसाठी होणाऱ्या रक्कम रुपये १० लक्ष इतक्या खर्चास आजची सभा सर्वानुमते आर्थिक व प्रशासकीय मंजुरी देत आहे.<br>सदरचा कार्यक्रम हा नवघर माणिकपुर प्रभाग समिती (एच) कार्यालय हद्दित असल्याने प्रभाग समिती (एच) डॉ. के.ब. हेगडेवार ग्रंथालय व वाचनालय, या ग्रंथालयामार्फत सदर कार्यक्रम राबविणे कामी आजची सर्वसाधारण सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे.<br>अनुमोदक - नितीन राऊत सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |
| ९ | **वसई-विरार शहर महानगरपालिकेच्या वर्ग ३ ,वर्ग ४ व इतर स्थायी कर्मचाऱ्यांना सानुग्रह अनुदान देणेबाबत.** | <u>**ठराव/निर्णय :-**</u> वसई - विरार शहर महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील नियमित वेतन श्रेणीवरील कायम कर्मचारी, वसई - विरार शहर महानगरपालिकेत वर्ग -१, वर्ग - २ व वर्ग - ३ च्या पदावर प्रतिनियुक्तीने कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना सन २०१४ - १५ मधील प्रत्यक्ष कामकाजाचे २६४ दिवस विचारात घेवुन रक्कम रु.१०,६८०/- सानुग्रह अनुदान देण्यात यावे. प्रकल्प अधिकारी , समुह संघटक, पेल्हार धरण योजनेवरील २५६ ई फॉर्मवरील व रोजंदारी कर्मचारी तसेच सुधारित राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण |

| | | |
|---|---|---|
| | | कार्यक्रमांतर्गत महानगरपालिका हद्दीत कार्यरत १८ कर्मचाऱ्यांना मार्च, २०१५ मध्ये प्रत्यक्ष अदा झालेले वेतन / मानधन किंवा सानुग्रह अनुदानाची रक्कम रु.१०,६८०/- यापैकी जी कमी असेल ती रक्कम सानुग्रह अनुदान म्हणुन अदा करणेस आजची ही सभा सर्वानुमते मंजुरी देत आहे. सन २०१५ चे दिवाळी सणानिमित्त द्यावयाचे सानुग्रह अनुदानापोटी होणाऱ्या खर्चास आजची ही सभा आर्थिक व प्रशासकिय मान्यता देत आहे.<br>अनुमोदक - सुदेश चौधरी सुचक - फ्रान्सिस डिसोजा (आपटे)<br>ठराव सर्वानुमते मंजुर |